# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**लेंडी आंतरराज्य प्रकल्प (ता.मुखेड, जि.नांदेड) या प्रकल्पाचे प्रलंबित काम पुर्ण करण्याबाबत**

**(१) ४०८१६ (०५-०४-२०२२). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेंडी (ता.मुखेड जि. नांदेड) या आंतरराज्य प्रकल्पाचे काम सुरु होऊन ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही सद्यस्थितीत प्रकल्पाच्या घळभरणीचे काम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्पाच्या घळभरणीच्या कामाचे नियोजन करुन काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पास सन १९८६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली असून माहे फ़ेब्रुवारी, १९८७ मध्ये कामास सुरुवात झालेली आहे. सन १९८७ ते २००३ या कालावधीत पुरेसा निधी उपलब्ध न झाल्यामुळे कामाची गती मंद होती. सन २००३-०४ मध्ये महाराष्ट्र व तेलंगाना या दोन राज्यात खर्चाबाबत करार झाला असून, त्यानुसार प्रकल्पास नियमित निधी उपलब्ध होत आहे. तथापि, प्रकल्पग्रस्तांनी दि. ०६ एप्रिल, २०११ पासून गोसीखुर्द प्रकल्पाच्या धर्तीवर पुनर्वसन पॅकेजची मागणी केल्यामुळे "आधी पुनर्वसन, नंतर धरण" या धोरणाप्रमाणे प्रकल्पाचे काम सध्या बंद आहे.

मुक्रमाबाद व इतर ११ गावांची स्वेच्छा पुनर्वसन व वाढीव कुटुंबास स्वेच्छा पुनर्वसनाबाबत दि.१३/०७/२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीत स्वेच्छा पुनर्वसनास खालीलप्रमाणे मंजूरी प्रदान करण्यात आली आहे,

१) मौ.मुक्रमाबाद, ता.मुखेड, जि.नांदेड येथील बाधीत व्यक्तींचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.

२) ज्या पुनर्वसित गावठाणामध्ये जमीन संपादित होऊ शकली नाही किंवा अंशत: जमीन संपादित झाल्यामुळे सर्व कुंटूंबाच्या पुनर्वसनाकरिता जमीन अपूरी पडत आहे. त्यासर्व कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.

३) प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या सर्व १२ गावांतील वाढीव कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.

दि.२३/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त बाब क्र.१ करिता, मुक्रमाबाद येथील बाधीत कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन प्रस्तावास शासन मान्यता प्रदान केली आहे.

अ.क्र. २ व ३ येथील निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाच्या सहमतीस सादर करण्यात येत असून त्यावर अंतिम निर्णय झाल्यानंतर पुनर्वसन प्रक्रीया पुर्ण करून माहे जून, २०२४ अखेर प्रकल्पाची घळभरणी करुन पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यात तीन तालुक्यात दोन वर्षापासून मृद व जलसंधारण विभागा अंतर्गत कामे मंजूर न केल्याबाबत**

**(२) ४०९९६ (११-०४-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यात धामणगाव रेल्वे मतदारसंघातील चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर येथे मृद व जलसंधारणाचे दोन वर्षात एकही काम झाले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इतर मतदारसंघात निधी दिला मात्र धामणगाव मतदार संघात २३ कामे प्रस्तावित असताना या कामांना मंजूरी तथा निधी देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदृअनुषंगाने धामणगाव मतदार संघातील प्रस्तावीत कामांना निधी तथा मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२२) :**(१) होय, अंशत : खरे आहे.

(२), (३) व (४) धामणगांव रेल्वे मतदार संघातील चांदुर रेल्वे, धामणगांव रेल्वे व नांदगाव ख. तालुक्यात मागील दोन वर्षात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जलसंधारणाच्या नवीन कामास प्रशासकीय मान्यता . मिळालेली नाही. निधी अभावी स्थगिती देण्यात आली होती.

मात्र सद्यास्थितीत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दि. ०९.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये नांदगांव खं. तालुक्यातील २६ द्वारयुक्त सि. ना. बंधा-यांच्या नविन कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच या तालुक्यातील ०५ प्रकल्पाच्या दुरुस्ती कामांना राज्य शासनाने मुख्यमंत्री जलसंर्धन योजनेमध्ये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तलाव दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(३) ४१०५५ (११-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्याचे पर्जन्यमान अत्यंत कमी असल्यामुळे येथे पाणी साठविण्यासाठी व सिंचनाची सोय व्हावी यासाठी बांधण्यात आलेल्या जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधारे, साठवण तलाव, पाझर तलाव इत्यादींच्या दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून देणेबाबत लोकप्रतीनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात सिंचनाची विशेष सोय नसल्याने पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे यासाठी तत्कालीन मा.पाटबंधारे मंत्री यांनी जिल्ह्यात कोल्हापुरी बंधारे, साठवण तलाव, पाझर तलाव इ. कामे केली असून सद्य:स्थितीत सदर कामांची देखभाल, दुरुस्तीची कामे न झाल्यामुळे पाण्याची गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जिल्हयातील ३६१ तलावांच्या दुरुस्तीच्या कामांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उस्मानाबाद जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधारे, साठवण तलाव व पाझर तलाव इ. कामांचे देखभाल व दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२२) :** (१) अशी बाब आढळून आली नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मृद व जलसंधारण विभाग, उस्मानाबाद अंतर्गत जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ९४ दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली आहे. सन २०२१-२०२२ मध्ये जिल्हा नियोजन समिती निधी व मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना अंतर्गत एकूण १४० (CMJSY-९५, DPC-४५) दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असुन त्यापैकी ९२ कामे (CMJSY-६३, DPC-२९) पूर्ण झाली आहेत. ३१ कामे प्रगतीपथावर असून १६ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत व १ (CMJSY) कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

जिल्हा परिषद ल.पा. विभाग, उस्मानाबाद अंतर्गत जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये मंजुर असलेली २९ दुरुस्ती कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२१-२२ मध्ये ४० दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून १८ कामे प्रगतीपथावर आहेत व २२ कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहेत.

त्यानुषंगाने मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना अंतर्गत पूर्ण झालेल्या दुरुस्ती कामांसाठी शासनाकडून निधी देण्याबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष भरुन काढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक मंडळ पुर्नगठित करण्याबाबत

**(४) ४१२१२ (१२-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष भरुन काढण्यासाठी मागील २६ वर्षापुर्व वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली असून या मंडळात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी पदांना आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंडळातील अधिकारी/कर्मचारी पदांना मुदतवाढ मिळाल्याने या मंडळाचे अध्यक्ष निवडले जाणार की नाही असा संभ्रम निर्माण झाला असून ही मंडळे राज्यशासनाच्या अखत्यारित येत नसल्याने या मंडळाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. ईएसटी-२०२१ /प्र.क्र.१५ /का.१४२६, दि.७/९/२०२१ द्वारे विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ आणि उर्वरीत महाराष्ट्र विकास मंडळांच्या कार्यालयांतील ५१ अस्थायी पदांना आणि सदर मंडळांच्या कामकाजासाठी नियोजन विभाग (खुद्द) येथील ६ पदांना दि.२८/२/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानंतर नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. ईएसटी-२०२२/प्र.क्र.१८/का.१४२६, दि.३/३/२०२२ द्वारे दि.३१/८/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(२) व (३), हे खरे नाही.

प्रादेशिक विकास मंडळांची मुदत दिनांक ३०/४/२०२० रोजी संपुष्टात आली आहे. तिन्ही विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात वित्त आयोगाच्या निधीकरिता आयसीआयसीआय बँकेत खाते उघडण्याबाबत

**(५) ४१२१४ (११-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वित्त आयोगाच्या निधीकरिता राष्ट्रीयकृत बँकेतील खाती बंद करुन आयसीआयसीआय बँकेत खाते उघडण्याचे आदेश शासनाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशान्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीं सध्या आयसीआयसीआय बँकेत खाते उघडण्याकरिता धावपळ सुरु असुन वित्त आयोगाच्या निधी खर्चात पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र शासनाने पीएफएमएस (पब्लिक फायनान्स मॅनेजमेंट सिस्टीम ) ही प्रणाली सुरु केली असून त्यानुसार निधीचे थेट वितरण डीएससीच्या माध्यमातून संबंधितांना ऑनलाईन केले जात आहे यामुळे आयसीआयसीआय बॅकेत खाते नसल्यास निधी वितरण होण्याकरिता विलंब होत आहे त्यामुळे निधीअंतर्गत होणाऱ्या जनतेच्या कामामध्ये दिरंगाई होत असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) हे खरे आहे,

(२) आतापर्यंत ३४ जिल्हा परिषद, ३५१ पंचायत समिती आणि २७१९८ ग्रामपंचायतींनी ICICI बँकेत १५ व्या वित्त आयोगाची खाती उघडली आहेत. ६६५ ग्रामपंचायतींनी अद्याप पर्यंत ICICI बँकेत खाते उघडलेले नाही. त्यांची खाती उघडण्याची प्रक्रिया सुरू आहे. अपर मुख्य सचिव (ग्रा.वि व पं.रा) यांनी VC व्दारे मुख कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना आयसीआयसीआय बँकेत लवकरात लवकर खाते उघडण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही,

---

### इगतपुरी -त्र्यंबकेश्वर तालुक्यात ( जि. नाशिक ) देवमोगरा सेवाभावी संस्थेने केलेल्या गैरव्यवहार

**(६) ४१३०८ (११-०४-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर ( जि. नाशिक ) तालुक्यात देवमोगरा सेवाभावी संस्थेने केलेल्या जलउपसा सिंचन योजनेतील भ्रष्टाचाराच्या प्रकरणासंदर्भात तात्काळ कारवाई करुन संबंधितावर गुन्हा दाखल करणे, तसेच शासनाने दिलेला निधी आणि जागेवर झालेला प्रत्यक्ष खर्च यात मोठया प्रमाणात तफावत असल्याने संबधित देवमोगरा सेवाभावी संस्था व संबधित कामावर शासनाने वाढीव निधी (सुप्रमा) न देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२२) :** (१)अंशत: खरे आहे

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि. ०८/०२/२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) मा. श्री.हिरामण खोसकर वि.स. स. यांच्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने यापूर्वी देखील या स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहेत. तसेच सदर विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधासभा अर्थसंकल्पीय अधिवेशन-२०२२ मध्ये मा. श्री.हिरामण खोसकर, वि. स. स. यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने उत्तर देतांना मा. मंत्री महोदयांनी

दिलेल्या अश्वासनाच्या अनुषंगाने प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, औरंगाबाद यांनी दि.११.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबत

**(७) ४१३१० (०९-०४-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील वाघोरा किल्ला (वाघेरा घाट) सतीदेवी परिसर, वाघेरा धरण परिसर, गडदवणे देवी, खैराई किल्ला, रोशनी डॅम, सारस्ते देवी मंदिर, गणेशगाव खंडोबा मंदिर, अंबोली डॅम, तोरंगण घाट, हरिहरेश्वर, वेळूंजे वन पर्यटन या पर्यटन स्थळांचा विकास करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.पर्यटन मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-११-२०२२) :** (१) होय.

(२) याबाबत संचालक, पर्यटन संचालनालय व जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील संत श्री निवृत्तीनाथ मंदिर त्र्यंबकेश्वर जिर्णोध्दार करिता पर्यटन विभगाकडून निधी मंजूर करण्याबाबत

**(८) ४१३१२ (०९-०४-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील संत श्री निवृत्तीनाथ मंदिर त्र्यंबकेश्वर जिर्णोध्दार करिता पर्यटन विभगाकडून निधी २२ कोटी २३ लक्ष मंजुर होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-११-२०२२) :** (१) होय.

(२) 'संत श्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज मंदिर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) परिसर विकास करणेबाबतचा रु.२२.२३ कोटी रकमेचा प्रस्ताव केंद्रीय पर्यटन मंत्रालयास सादर करण्यात आला होता. त्यानुसार यापूर्वी प्रसाद योजनेंतर्गत त्र्यंबकेश्वरसाठी मंजूर असलेल्या रु.३७.८१ कोटी आराखड्यामध्ये संत श्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज मंदिर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) या आराखड्याचा समावेश करण्यात आला आहे. सुधारीत केलेल्या आराखड्यात त्र्यंबकेश्वरसाठी रु.३७.८१ कोटी व संत श्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज मंदिर रु.१५.११ कोटी अशा एकूण रु.५२.९२ कोटीच्या आराखड्यास सुधारीत मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर सुधारित मंजुरीच्या अनुषंगाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मृद व जलसंधारण विभागाच्या बुलढाणा जिल्ह्यात निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९) ४१३१६ (११-०४-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मृद व जलसंधारण विभागाने बुलढाणा जिल्ह्यात सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात रुपये १७३ कोटींच्या निविदा काढल्या असून शासन धोरणांशी पूर्णपणे विसंगत वेगवेगळ्या १४९ कामांना एकत्रिक करुन केवळ २५ कामांची रुपये १७३ कोटींची निविदा काढल्या आहेत, सदर कामे शासन धारेणानुसार लहान कंत्राटदारास न देता मर्जीतील मोठ्या कंत्राटदारास देवून निविदेतील कामांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनमुळे शासकीय निधीअभावी निविदा सूचना प्रकाशित न करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असताना देखील बुलढाणा जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांच्या निविदा सूचना काढण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १४९ कामांना एकत्रित करुन शासन धोरणाचे उल्लंघन करुन केवळ २५ कामांची रुपये १७३ कोटींची निविदा काढणाऱ्या व नियमबाह्य देयके अदा करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०७-२०२२) :** (१) हे खरे नाही.

मृद व जलसंधारण विभाग बुलढाणा या कार्यालयाने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद निधीस्त्रोतातील १३२ कामांसाठी रु. १५७५६.७५ लक्ष किंमतीच्या २४ ई-निविदा व शासन निधीतील १८ कामांसाठी रु. १४९८.७४ लक्ष किंमतीची १ ई-निविदा अशा एकूण २५ ई-निविदा माहे फेब्रुवारी, २०२१ रोजी काढलेल्या आहेत. सदर १५० कामे विसंगत स्वरूपाची नसून सर्व कामे द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधारे व सिमेंट साठवण बंधारे या स्वरूपाची आहेत.

सदर निविदांची वर्तमानपत्रात प्रसिध्दी करणे व ऑनलाईन अपलोड करणे या प्रक्रीया तसेच निविदांसंदर्भातील इतर कार्यवाही नियमानुसार करण्यात आलेली आहे. तसेच सदरील कामे गुणवत्तापुर्वक पूर्ण होण्यासाठी सुसंगत कामांचे उपविभागनिहाय एकत्रीकरण करण्यात आले आहे.

तसेच सदरील निविदा ह्या ई-निविदा प्रक्रियेने पूर्ण करण्यात आल्या असून ई-निविदेमध्ये निकोप स्पर्धा झालेली आहे, व सर्व निविदा या न्युनतम देकाराने मंजूर करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. १ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार ७५ टक्के निधीमधील उर्वरित २५ टक्के निधीच्या मर्यादेत नव्याने अर्थसंकल्पीत करावयाची बांधकामे/मत्ता निर्मीतीची कामे हाती घेता येतील असे निर्देशित केलेले आहेत. व त्यानुसारच ई-निविदेची कार्यवाही सक्षम स्तरावरुन मंजूरी घेवुन करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती, जळगाव अंतर्गत सेस २० टक्के निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना लॅपटॉप देण्याबाबत**

**(१०) ४१६५३ (०१-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, जळगाव अंतर्गत २० सेस टक्के निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना लॅपटॉप घेण्यासाठी सन २०१७-२०१८ चे रुपये ३,१०,६३०/- अनुदान प्रदान करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ९ लाभार्थी मंजूर असताना एकूण ११ लाभार्थी यांना लाभ दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा लाभ जे विद्यार्थी शाळा शिकत असतील अशा विद्यार्थ्यांना देय असताना हर्षल ठाकरे व मोहिनी धनगर या शाळा शिकत असल्याचा दाखला मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुषंगाने जास्त लाभार्थी वाटप करणाऱ्या संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-११-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर योजनेंतर्गत जळगाव पंचायत समितीकडे एकूण ११ मागासवर्गीय लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. जळगाव पंचायत समितीने पंचायत समिती स्तरावर ठराव घेऊन ९ लाभार्थ्यांची संख्या निश्चित करून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली होती. तथापि, काही लाभार्थ्यांचे देयक रक्कम कमी असल्यामुळे अर्ज प्राप्त सर्व ११ लाभार्थ्यांच्या (नियमित ९ व अतिरिक्त २ लाभार्थी) बँक खात्यावर अनुदानाची रक्कम डीबीटी द्वारे जमा करण्यात आलेली आहे. सदर ११ लाभार्थी यांची निवड यादी पंचायत समितीकडे उपलब्ध असून दोन अतिरिक्त लाभार्थ्यांसंदर्भात पंचायत समिती स्तरावर ठराव /मान्यता घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. याबाबत जळगाव जिल्हा परिषद स्तरावर चौकशी समिती नेमून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## चामोर्शी (जि.गडचिरोली) येथे क्रीडा संकुलाचे काम सुरु करण्यास होणाऱ्या विलंबाबाबत

**(११) ४१८०३ (०७-०४-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) येथे क्रीडा संकुलाच्या कामास मंजुरी मिळाली असून ९.५० कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुका क्रीडा संकुलाच्या कामास प्रशासकीय मान्यताही देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मान्यतेनुसार जागा मंजुरी व निधी उपलब्ध असूनही अजूनपर्यंत काम सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :**(१) व (२) चामोर्शी (जि. गडचिरोली) तालुका क्रीडा संकुलाच्या रु. ९५४.०० लक्षच्या अंदाजपत्रकास शासन देय अनुदान मर्यादेव्यतिरिक्त लागणारा अतिरिक्त निधी संकुल समितीने उभारण्याच्या अटीवर दि. ११.०६.२०२० रोजी मान्यता दिलेली आहे.
(३) व (४) संकुल समितीस रु. ३५.१५ लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्यात आला असून विविध खेळांची मैदाने तयार करण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील नवीन ग्रामपंचायतींची निर्मिती करण्याबाबत

**(१२) ४१८०६ (११-०४-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात १६८८ हून अधिक गावे असून या गांवापैकी फक्त ४६७ ग्रामपंचायती असून एका ग्रापंचायतीमध्ये ५-५ गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावापासून ग्रामपंचायतीचे अंतर अधिक असल्याने शासकीय कामांसाठी लागणाऱ्या दाखल्यासाठी विद्यार्थी व ग्रामस्थाना पायी प्रवास करावा लागत असून सुविधांअभावी अशा गावांचा विकास होण्यास अडथळे येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने बहुसंख्य गावे असणाऱ्या ग्रामपंचायतीचे विभाजन करुन नवीन ग्रामपंचायतींची निर्मिती आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे विभाजन करुन नवीन ग्रामपंचायती निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
गडचिरोली जिल्हयात १६५३ गावे असून जिल्हयात एकूण ४५८ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४)
ज्या ग्रामपंचायतींनी विभाजनाचे ठराव मंजूर केले आहेत अशा ग्रामपंचायत विभाजनाचे जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त प्रस्तावांना प्रचलित निकषांनुसार मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाभुळगांव (जि. यवतमाळ) येथील अधिग्रहीत शेतजमिनी मध्ये बेंबळा प्रकल्पाचे पाणी जमा होऊन शेती पिंकाचे नुकसान होत असल्याबाबत

**(१३) ४१८१४ (०१-०४-२०२२). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फाळेगाव (ता.बाभुळगाव, जि यवतमाळ) येथील श्री गोपाल गणपतराव बावनकर रा फाळेगाव आणि सुदाम महादेव डोलार, फाळेगाव, श्री.संजय ऐकनाथ शिंदे, कोल्ही यांचे शेत सर्वे क्र ५३, ५५, ११५, यांचे शेत बेंबळा प्रकल्पाच्या बाजुला असल्याने प्रकल्पामध्ये पाणी साठा वाढल्यास शेतकऱ्यांच्या शेतात पाणी येऊन शेती पिकाचे नुकसान होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेंबळा प्रकल्प मध्ये शेतकऱ्यांच्या शेत जमिनी अधिग्रहीत केल्या परंतु काही जमीनी अधिग्रहीत केल्या नसल्याने त्या शेतजमीनीत बेंबळा प्रकल्पातील पाणीसाठयामध्ये वाढ झाल्यास शेतात पाणी येवून पिकाचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना शेतपिक नुकसान मोबदला देण्यात आला नसल्याने चौकशी करुन शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत तसेच जमिन अधिग्रहन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
फाळेगांव ता. बाभुळगांव जि. यवतमाळ येथील श्री. गोपाल गणपतराव बावनकर रा. फाळेगांव आणि श्री. सुदाम महादेवराव डोलारे रा. फाळेगांव, अनुक्रमे गट क्र. ५३, ५५ यांचे शेतात धरणाचे पुर्ण संचय पातळीचे (२६८.०० मी) पाणी येवुन नुकसान होत असल्याचे निर्देशनास आल्याने, त्यांचा अतिरीक्त भुसंपादनाचा प्रस्ताव सरळ खरेदीद्वारे करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
तथापी श्री.संजय एकनाथ शिंदे कोल्ही, यांचे शेत सर्व्हे क्र. ११५, बेंबळा प्रकल्पांच्या बुडित क्षेत्रामुळे अंशत: बाधीत होत असल्याने तेवढेच क्षेत्र यापुर्वी संपादीत करण्यात आलेले आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
बेंबळा प्रकल्पांचे बुडित क्षेत्राचे संपादन यापुर्वी मुळत: संकल्पीत पुर्ण संचय पातळी २७०.०० मी. नुसार करण्यात आलेले आहे.

तदनंतर बेंबळा प्रकल्पांचे फेर रचना व समरुपता अभ्यासाला शासनाने मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाची पुर्ण संचय पातळी कमी झाली (२७०.०० मी. वरुन २६८.०० मी.) त्यामुळे शेतात पाणी येवुन नुकसान होण्याचा प्रश्न नाही. तथापी काही भुधारकानी त्याबाबत अर्ज केले आहे. त्यानुसार प्रकल्पांची पुर्ण संचय पातळी बाबत त्याक्षेत्राचे पुर्णत: सर्व्हेक्षण करण्याचे काम नियोजीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि. जळगाव) पंचायत समिती यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी प्राप्त अनुदान रक्कमेबाबत**

**(१४) ४१८२० (११-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि. जळगाव) पंचायत समिती यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी प्राप्त अनुदान रक्कम रुपये ६,९०,०००/- मधून रक्कम रुपये ६,५०,३३१/- खर्च झाले असून रक्कम रुपये ३९,६६९/- अनुदान सन २०१७-१८ सालाचे अखर्चित राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंदाजपत्रकाला उपअभियंता लघुसिंचन यांची तांत्रिक मान्यता घेवून काम पूर्णत्वाचा दाखला पहाणी करुन मोजमाप पुस्तिकेत प्राप्त करणे आवश्यक असताना याबाबत कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-११-२०२२) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथे मागील दीड वर्षापासून मुख्यालयाकडून निधी प्राप्त न झाल्याबाबत**

**(१५) ४१९९३ (१२-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे मागील दीड वर्षापासून मुख्यालयाकडून निधी प्राप्त न झाल्याने जिल्हा परिषदेच्या जलसंधारण (लघु सिंचन ) विभागाची आर्थिक स्थिती बिकट झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विभागाकडे अर्थसहाय्य नसल्याने उक्त कारणास्तव कामकाज चालविण्यासाठी वाहनांसाठी डिझेल खर्च भागविणे, इंटरनेट बंद, विजबिलेही थकीत असणे यासाठी त्यांना अन्य विभागांसाठी वारंवार मागणी करावी लागते सदर विभागाच्या कामकाजावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने जनतेच्या कामांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर निधी त्वरीत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.

(२)  होय, हे खरे आहे.
(३)  जिल्हा परिषद (लघु सिंचन) विभागामार्फत मागणी केलेल्या निधीचे वितरण आयुक्त मृद व जलसंधारण, औरंगाबाद यांचेकडून केले जाते. सदर वेतनेतर खर्चासाठी आयुक्तालयाला सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये अर्थसंकल्पीय अनुदान मागणीच्या  प्रमाणात कमी मंजुर झाले आहे, मात्र प्राप्त अनुदानाप्रमाणे  निधी वितरित करण्यात आला आहे.

सन२०२१-२२ मध्ये मंजुर अनुदानाच्या  ३० टक्के निधी  वित्त विभागाडून वितरित करण्यात आला आहे. तसेच वेतन उद्दिष्टांच्या अनुषंगाने मंजूर अनुदानाच्या ९५ टक्के अनुदान प्राप्त झालेले असून त्याचे समप्रमाणात वितरण करण्यात आले आहे.
(४)  प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.गोणेगांव (ता.मुखेड, जि. नांदेड ) या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या स्वेच्छा पुनर्वसनाबाबत.**

**(१६)  ४२०६४ (०१-०४-२०२२).  डॉ.तुषार राठोड (मुखेड) :**  सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.गोणेगांव (ता.मुखेड, जि. नांदेड ) येथील प्रकल्पबाधीतांनी आंदोलन करुन बंद पाडलेल्या मूळ ५२ कोटी रुपये किंमत असलेल्या आंतरराज्य लेंडी प्रकल्पाची आताची किंमत २०३३ कोटी रुपये झाली आहे, हे खरे आहे काय,
(२)  असल्यास,  सदर प्रकरणी तत्कालीन जलसंपदा मंत्र्यानी या प्रकल्पाच्या बाधीत क्षेत्रातील, पुनर्वसन न झालेल्या गावांच्या स्वेच्छापुनर्वसनाला दिनांक १ नोव्हेबंर,२०१८ रोजी झालेल्या बैठकीत तत्वत: मंजूरी दिली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पुनर्वसन प्राधिकरणाने विशेष बाब म्हणून दिनांक १३ जुलै,२०२१ रोजी वा त्यासुमारास  झालेल्या बैठकीत स्वेच्छा पुनर्वसनाला मंजूरी दिली तसेच सध्या हा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागात प्रलंबित आहे व या विभागांच्या मंजूरीशिवाय स्वेच्छा पुनर्वसन व विस्थापितांसाठी विशेष पॅकेज मंजूर करता येणार नाही,  हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, चौक्शी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर संबंधित विभागांच्या मंजूरी व त्यानंतरचा शासननिर्णय निर्गमित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२२) :** (१) होय, हे  खरे आहे.
(२)  होय, हे खरे आहे.
(३)  व  (४)  हे अंशत: खरे आहे.

मुक्रमाबाद व इतर ११ गावांची स्वेच्छा पुनर्वसन व वाढीव कुटुंबास स्वेच्छा पुनर्वसनाबाबत दि.१३/०७/२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीत खालील प्रमाणे तीन निर्णयांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे:-
१) मौ.मुक्रमाबाद, ता.मुखेड, जि.नांदेड येथील बाधीत    व्यक्तींचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.
२) ज्या पुनर्वसित गावठाणामध्ये जमीन संपादित होऊ शकली नाही किंवा अंशत: जमीन संपादित झाल्यामुळे सर्व कुटुंबांच्या पुनर्वसनाकरिता जमीन अपूरी पडत आहे. त्या सर्व कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.
३) प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या सर्व १२ गावांतील वाढीव कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन करणे.
जलसंपदा विभागाच्या दि.२३/०३/२०२२ शासन निर्णयान्वये उपरोक्त बाब क्र.१ करिता, मुक्रमाबाद येथील बाधीत कुटुंबांचे स्वेच्छा पुनर्वसन प्रस्तावास शासन मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त (२) व (३) येथील प्रस्तावांना व वित्त व नियोजन विभागाची सहमती प्राप्त नसल्याने त्यांच्या सहमतीसाठी आद्यवत सुधारीत प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात असमतोल असल्याबाबत

**(१७) ४२०८२ (०१-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये ग्रामविकास विभागामार्फत विकास योजना राबवितांना निधी वाटप करतांना उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात असमतोल झाल्याबाबत एका राजकीय पक्षाच्या जिल्हा अध्यक्षांनी दिनांक ०२/०२/२०२२ रोजी लेखी पत्राद्वारे शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उस्मानाबद जिल्ह्यातसन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये २५१५ या शीर्षका अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या निधीमध्ये विधानसभा मतदार संघनिहाय व तालुका निहाय रस्त्याची लांबी व देण्यात आलेल्या निधीचा तपशील उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधी मागणी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ८ तालुके व ४ विधानसभा मतदार संघ असून मागणीच्या अनुषंगाने तपशील उपलब्ध करून देण्यात आला आहे काय, नसल्यास केंव्हापर्यंत उपलब्ध करून देण्यात येईल,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर असमतोल दूर करण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०६-१२-२०२२) :** (१) अशी तक्रार विभागाकडे आढळून येत नाही.

(२) व (३) अशी मागणी विभागाकडे तसेच जिल्हा परिषदेकडे केल्याचे दिसून येत नाही. तथापि, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये अनुक्रमे रु. २६.५८ कोटी आणि रु. १६.६० कोटी इतका निधी मंजूर केला आहे.

(४) व (५) लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासन मान्यतेने व उपलब्ध निधीच्या मर्यादेत ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांसाठी कामांना मंजुरी देण्यात येते. सदर योजनेंतर्गत कामे मंजूर करण्याचे अंतीम अधिकार शासनास आहेत.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-३ (बॅच-१) च्या कामाच्या प्रसिध्द केलेल्या निविदा बाबत

**(१८) ४२०९० (०७-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-३ (बॅच-१) अंतर्गत मंजूर असलेल्या कामापैकी उस्मानाबद-तुळजापूर-कळंब तालूक्यातील कामांची निविदा दिनांक १७.०१.२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर योजनेंतर्गत २०२०-२१ साठी जिल्ह्यात ११९.५७५ कि.मी. ची रु. १०१४६.३ लक्षची एकूण १७ कामे (तालुकानिहाय कामे तुळजापूर-३, उस्मानाबाद-३, कळंब-४, भूम-१, परंडा-२, वाशी-२, उमरगा-१ व लोहारा-१) मंजूर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे एकत्रित निविदा काढण्याच्या काही लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील कामे व्यवस्थित व गुणवत्तापूर्वक व्हावीत यासाठी जिल्ह्यातील ३ विधानसभा सदस्यांनी पत्राद्वारे मतदारसंघ निहाय स्वतंत्र निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनास कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उमरगा मतदार संघातील विधानसभा सदस्याच्या मागणीनुसार राज्य शासनाच्या जा.क्र.ग्रासयो-२०२१/प्र.क्रं.१९२/बांधकाम-१ दि.१४ ऑक्टोबर, २०२१ या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (प्रमग्रासयो), उस्मानाबाद यांस 'उमरगा - लोहारा मतदार संघातील कामाची निविदा प्रक्रिया वगळून उर्वरित जिल्ह्याकरिता एकत्रितपणे निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.' असे कळविले तसेचयामध्ये दिनांक २२.११.२०२१ रोजी वा त्यासुमारास २ कामांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर परंडा मतदार संघातील कामांबाबत स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कळविले व यात ५ कामांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली तसेच जिल्ह्यातील उस्मानाबाद व तुळजापूर मतदार संघाची एकत्रीक निविदा दिनांक १७.०१.२०२२ रोजी काढून तुळजापूर मतदार संघाच्या प्रतिनिधींच्या मागणीनुसार त्यांच्या मतदार संघातील कामांची स्वतंत्र निविदा प्रक्रिया न राबविण्याची कारणे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने राज्यात अशा पद्धतीने निविदा प्रक्रिया काढण्याचे प्रकार कोठे घडलेले आहेत, उक्त मतदारा संघातील नागरिकांना निधी वाटप व विकास कामासंदर्भात समान न्याय देण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-११-२०२२) :** (१) होय.
(२), (३) व (४) होय. हे खरे आहे.
(५) तसेच २४३-परंडा मतदारसंघातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती केल्यानुसार भूम-परंडा-वाशी तालुक्यांतर्गत एकूण ०५ कामांची निविदा प्रक्रिया दि.२७.१२.२०२१ रोजी स्वतंत्रपणे राबविण्यात आली.

उर्वरित ०३ तालुक्यातील (उस्मानाबाद-तुळजापूर-कळंब) एकूण १० कामांच्या एकत्रित निविदा प्रक्रिया मा.स्थानिक खासदार यांचे विनंतीनुसार दि.१७.०१.२०२२ रोजी स्वतंत्रपणे राबविण्यात आली.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शास्त्रीनगर (जि.पुणे) येथील इमारतीचे बांधकाम सुरू असताना झालेल्या दुर्घटनेबाबत

**(१९) ४२२३२ (०७-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यात येरवडा परिसरातील शास्त्रीनगर लेन नं.८ येथील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचे लोखंडी छत दिनांक ०४ फेब्रुवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास कोसळून झालेल्या घटनेत ७ कामगारांचा मूत्यू झाला तसेच ८ कामगार गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने मृत कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत तसेच जखमींना औषधोपचारासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१०-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे

मे.नेफ्रोनिया इकोस्पेसेस एलएलपी येरवडा, जि.पुणे ४१० ००६ येथे बांधकामाच्या साईटवर दिनांक ०३.०२.२०२२ रोजी रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास बी बिल्डींगचे फुटींगचे काम चालू असताना स्टील रॉडचा सांगाडा पडल्याने त्याखाली दाबले गेल्याने पाच कामगार मृत झाले व चार कामगार जखमी झालेले आहेत.
(२) कंत्राटदार मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्टस् इंडिया लि. व इतर यांचे विरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन, पुणे येथे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०४, ३३६, ३३७ व ३३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ चा नियम क्रमांक २६३ (१) अन्वये सदरील आस्थापनेचे काम बंद करण्यात आले.

कंत्राटदार मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्टस् इंडिया लि. यांनी मयत पाच कामगारांच्या वारसदारास कामगाराच्या अंत्यविधीकरीता रोख रक्कम रु.५०,०००/- व त्यांच्या बँक खात्यामध्ये रु.२,५०,०००/- एवढी रक्कम जमा करण्यात आली आहे. सदर घटनेत जखमी झालेल्या कामगारांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती कंत्राटदार मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्टस् इंडिया लि. यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. तसेच वैद्यकीय खर्चाव्यतिरिक्त सदर जखमी कामगारांना माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंतचे वेतन कंत्राटदारामार्फत आदा करण्यात आले आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत दिनांक ०३.०३.२०२२ रोजी विशेष बाब म्हणून प्रत्येक मयत कामगाराच्या कायदेशीर वारसदारास रु.५,००,०००/- व जखमी कामगारास रु.२,००,०००/- एवढे अर्थसहाय्य DBT द्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा विधानसभा मतदारसंघातील पक्का रस्ता नसलेल्या गावांसाठी जोडणाऱ्या कच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत**

**(२०) ४२२४५ (०७-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) विधानसभा मतदारसंघातील अनेक गावे, तांडे व वाड्या वस्तीला जाण्यासाठी पक्की डांबरी रस्ते नसल्यामुळे या गावातील नागरिकांची रस्त्याअभावी दळणवळणाची गैरसोय होत असल्याने सदर गावांच्या ग्रामीण मार्ग दर्जा असलेली जोडरस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत. जिल्हा वार्षिक योजना निधी वा राज्यस्तरीय ग्रामविकास विभागाच्या रस्ते विकास कार्यक्रम निधीतून प्राधान्याने मंजूरी देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लातूर येथे दिनांक ११/१२/२०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या आढावा बैठकीत निवेदनाद्वारे तसेच मा.पालकमंत्री लातूर यांच्याकडे दिनांक २६ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास तसेच मा. जिल्हाधिकारी लातूर व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे प्रत्येक लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ते नसलेल्या गावांना प्राधान्याने रस्ते मंजूर करण्याबाबत वेळोवेळी झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समीतीच्या बैठकीत पालकमंत्री महोदय यांनी संबधितास निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मतदारसंघातील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यास तसेच अद्याप रस्त्यापासून वंचित गावांना रस्ता मंजूर करण्याबाबत व त्यासाठी आवशक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) औसा विधानसभा मतदारसंघातील गावे व तांडे वाडया वस्तीला जाण्यासाठी खालील प्रमाणे पक्के डांबरी रस्ते करणे आवश्यक आहे :-
१. तुंगी – इजिमा. १०१
२. केंगलवाडी – ग्रामा. ८२
३. आलमला ते आलमला तांडा- ग्रामा. १३
४. चिंचोली तपसे ते लाडवाडी –ग्रामा. ११५
उपरोक्त रस्त्यांपैकी इजिमा क्रमांक १०१ दर्जाच्या रस्त्याचे सन २०२०-२१ मध्ये गट अ अंतर्गत रु. ६.५० लक्ष निधीचे काम पुर्ण करण्यांत आले आहे. उर्वरीत रस्त्यांची दुरुस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कशेळी (ता. राजापूर) येथील मंदिर कोकणपर्यटन विकास आराखडयामध्ये समाविष्ट करुन अर्थसंकल्पामध्ये (बजेट) तरतूद करण्याबाबत**

**(२१) ४२२८७ (०७-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कशेळी (ता. राजापूर) येथील प्राचीन सूर्य मंदिर हे मंदिर ग्रामीण कोकण पर्यटन विकास आराखडयामध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सूर्य मंदिर पर्यटन विकास आराखडयामध्ये समाविष्ट करुन अर्थसंकल्पामध्ये (बजेट) तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक ०६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री, तथा अर्थमंत्री यांना निवेदन दिले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर मंदिर कोकण पर्यटन विकास आराखडयामध्ये समाविष्ट करुन अर्थसंकल्पामध्ये (बजेट) तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-११-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) मौजे कशेळी येथील प्राचीन सुर्य मदिरास “क” वर्ग दर्जा देण्यात आला आहे. तसेच, जिल्हा स्तरीय यात्रास्थळ योजनेतर्गंत सदर मंदिराच्या ठिकाणी वाहनतळ बांधणे व सभामंडप बांधणे यासाठी प्रत्येकी रु.१०.०० लक्ष असा एकूण रु.२०.०० लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. तसेच गावातर्गंत मुलभूत सुविधा (२५१५ १२३८) योजनेतर्गंत मंदिर परिसरात वाहनतळ, स्वच्छतागृह, हायमास्ट लाईट बसविणे इ. कामासाठी रु.१२.०० लक्ष असा एकूण रु.३२.०० लक्ष इतका निधी मंजूर झाला आहे. तसेच सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात कोकण ग्रामीण पर्यटन योजनेतर्गंत जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार मौजे कशेळी येथील २ कामांना प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद शहरातील हॉलीबॉल मैदानाची दुरुस्ती न केल्याने खेळाडूंनी शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार परत केल्याबाबत**

**(२२) ४२४७५ (१२-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरातील व्हॉलीबॉल मैदानाची दुरावस्था झाल्याने त्याच्या दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी क्रीडा प्रेमींनी वेळोवेळी निवेदन देऊनही अद्याप दुरुस्ती न झाल्यामुळे मिळालेला शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंनी शासनास परत केल्याचे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरात व्हॉलीबॉल खेळणाऱ्या ११ खेळाडूंना राज्य संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली होती व १० खेळाडूंना भारतीय संघाच्या प्रशिक्षण शिबीरासाठी निवड झाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चॅलेंजर्स स्पोर्टसच्या खेळाडूंनी व्हॉलीबॉल या खेळामध्ये राष्ट्रीय, अंतर विद्यापीठ व अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्तरावर झालेल्या स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार व्हॉलीबॉल मैदानाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२२) :**(१), (२), (३) व (४) नगर परिषद, उस्मानाबाद यांच्या मार्फत केल्या जात असलेल्या, उस्मानाबाद शहरातील व्हॉलीबॉल मैदानाची दुरुस्ती व इतर कामांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता

मिळाली असून, प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या निधीतून सदर मैदानाची दुरुस्ती करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील संतमुक्ताबाई समाधी स्थळाच्या विकासाला निधी देण्याबाबत..**

**(२३) ४२४९७ (०७-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील मुक्तानगर तालुक्यातील लाखो वारकऱ्यांचे श्रध्दास्थान असलेले श्री क्षेत्र कोथळी मंदीर जिर्णोध्दराचे काम निधी प्रभावी प्रलंबित असल्याचे दि. २२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सप्त शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षातच शासनाच्या या उदासीनतेमुळे वारकरी असंतोष व नाराजी व्यक्त करीत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४)असल्यास, तयानुसार उक्त मंदिराच्या जिर्णोध्दरासाठी निधी उपलब्ध करुन कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२९-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) याप्रकरणी असे पत्र अथवा निवेदन प्राप्त नाही.
(३) व (४) श्री क्षेत्र कोथळी मंदिर, मुक्ताईनगर, जळगाव या विकास आराखड्यास शासननिर्णय क्र. तिर्थवि २०१६/प्र.क्र.४५/यो-६, दि. २८ मार्च, २०१८ अन्वये रु.९०८.६७ लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु. ४००.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, जळगाव यांना वितरीत केला असून उर्वरित रु. ५०८.६७ लक्ष इतक्या रक्कमेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यात सन जानेवारी-२०१८ पासून ग्रामपंचायत सदस्य यांना मानधन मिळाले नसल्याबाबत**

**(२४) ४२५७२ (०१-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन-२००९ च्या शासन निर्णय मध्ये सुधारणा करून ०६ सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णया नुसार ग्रामपंचायत सदस्य यांना प्रत्येक मासिक बैठकी साठी २०० रू भत्ता/मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे तसेच एका ग्रामपंचायत सदस्याला पाच वर्षात ६० बैठकासाठी १२०००/- रू मानधन मिळणे आवश्यक आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केज मतदारसंघ तसेच बीड जिल्ह्यातील सर्व मतदारसंघ मधील बहुतांश ग्रामपंचायत कालावधी संपण्यासाठी फक्त १० महिने बाकी असून हे सदस्य निवडून येऊन चार वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे तरी देखील अद्यापही त्यांना मानधन मिळालेले नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामपंचायत सदस्य यांना मानधन मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २४/१२/२०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे सदरहू प्रकरणी किती ग्रामपंचायत सदस्यांना प्रलंबित मानधन वाटप करण्यात आले, तसेच त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर प्रलंबित मानधनास निधी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) ग्रामपंचायत कर्मचारी यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे, त्याच पध्दतीने व त्याच प्रणालीद्वारे सरपंच, उपसरपंच यांचे मानधन व ग्रामपंचायत सदस्य बैठक भत्ता ऑनलाईन पध्दतीने थेट त्यांच्या बॅंक खात्यात जमा करणेबाबतचा निर्णय ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १४.८.२०१९ अन्वये घेण्यात आला आहे. परंतु ग्राम पंचायत सदस्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांना विद्यमान संगणक प्रणालीद्वारे बैठक भत्ता देणे शक्य होत नाही. या अनुषंगाने ग्राम पंचायत सदस्यांची बैठक भत्ता प्रतिपूर्तीसाठी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्रामस्वराज, अभियान, पुणे ( RGSA) यांचेकडून निधी जिल्हा परिषदांना देण्यात येईल व संबंधित जिल्हा परिषदमार्फत ग्रामपंचायतींना बैठक भत्ता प्रतिपूर्ती करण्यात येईल असे निदेश शासन पत्र दि.१.४.२०२२ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्रामस्वराज, अभियान, पुणे यांना देण्यात आले आहे. त्यानुसार राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्रामस्वराज, अभियान, पुणे यांच्याकडून जिल्हा परिषदांकडून आवश्यक निधीची मागणी करुन त्यांना निधी वितरीत करणेची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र सरकारची राज्यातील जिल्हा ग्रामीण विकास विभाग बंद करण्यात येणार असल्याबाबत

**(२५) ४३०८१ (११-०४-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने दिनांक १ एपिल, २०२२ पासून जिल्हा ग्रामीण विकास विभाग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर राज्यात केंद्र सरकारच्या योजना राबविण्याबाबत व त्यांच्या देखरेखीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर केंद्र सरकारच्या योजनांवरील देखरेखीसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.
ग्राम विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. ०१/११/२०२१ च्या पत्रान्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद मध्ये विलिन करुन दि. १ एप्रिल, २०२२ पासून बंद करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(२) नाही.
(३) दि. ३१ मार्च, २०२२ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा योजना बंद करण्याऐवजी राज्य शासनाकडून १००% राज्य योजना म्हणून पुढील पाच वर्षापर्यंत सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज तालुक्यात (जि. बीड) अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(२६) ४३०९९ (०७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज तालुक्यात (जि. बीड) अतिवृष्टीमुळे जिल्हा परिषद अंतर्गत जवळपास ५९ रस्ते व पूल नादुरुस्त झाले आहेत, जागोजागी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडचणी निर्माण होत आहेत तसेच खराब रस्त्यामुळे सदर मार्गावरील बससेवा ही बंद झाल्या असल्याने सदर रस्ते तातडीने दुरुस्त करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने सदरहू रस्ते व पुलांच्या तात्काळ दुरुस्तीस निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(२) अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या ग्रामीण मार्गांसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभाग आणि मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्यात आला आहे.
तसेच रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम योजने अंतर्गत सन २०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ या अर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद, बीड करीता अनुक्रमे रु.७६०.१० लक्ष, रु.९५५.३५ लक्ष व रु.१४६७.६४ लक्ष एवढया निधीची कामे मंजूर करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) विधानसभा मतदारसंघात स्मशानभूमीसाठी जमिन संपादनासाठी निधी मंजूर करणेबाबत

**(२७) ४३१२९ (३१-०३-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) विधानसभा मतदारसंघातील बहुतांश: गावात सार्वजनिक दहन व दफन भूमी नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना अंत्यविधीसाठी गैरसोय होत असल्याने स्मशानभूमी नसलेल्या गावात गावाशेजारील ओढा नाला किंवा तलाव शेजारील संपादित पोटखराब जमीन किंवा खाजगी जमिन संपादन करण्याबाबत आणि शेड बांधकाम करण्याबाबत आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे तसेच दिनांक २१ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या जिल्हा वार्षिक योजना राज्यस्तरीय बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी सन २०१९ ते आजतागायत सार्वजनिक स्मशानभूमी नसलेली गावे किती आहेत तसेच, किती ग्रामपंचायतीने स्मशानभूमीसाठी भूमी संपादनाचा प्रस्ताव सादर केला असून त्यापैकी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली व प्रलंबित प्रकरणे किती आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार सदर प्रकरणे निकाली काढण्याबाबत व उक्त मागणीच्या अनुषंगाने स्मशानभूमी नसलेल्या गावात दहन व दफन भूमीसाठी जमीन संपादन व शेड बांधकामासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ राज्यस्तरीय बैठक दिनांक २१.१.२०२२ मध्ये लातूर जिल्ह्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे.
(२) औसा विधानसभा मतदारसंघामध्ये औसा व निलंगा तालुक्यातील एकूण २१८ गावे असून त्यापैकी १४७ गावांमध्ये दहनभूमी/ दफनभूमी आहे. तर, ७१ गावांमध्ये दहनभूमी / दफनभूमी उपलब्ध नाही. यापैकी १९ ग्रामपंचायतींनी जागा उपलब्ध नसल्याने तहसील कार्यालय, औसा यांच्याकडे भूसंपादन प्रस्ताव सादर केले आहेत. उर्वरित ग्रामपंचायतींना भूसंपदनाचे प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.
(३) औसा मतदारसंघामध्ये जिल्हा वार्षिक योजनांतर्गत सन २०१९-२० ते २०२१-२२ मध्ये एकूण ६२ गावांना स्मशानभूमी बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे , तसेच स्मशानभूमीसाठी संरक्षक भिंतीची ४३ कामे मंजूर केली आहेत. उर्वरित गावांसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजना व इतर योजनांमधून स्मशानभूमीची कामे प्रस्तावित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री निळकंठेश्वर देवस्थान (ता.औसा, जि.लातूर) या तीर्थक्षेत्र विकासासाठी निधी मंजुरीबाबत**

**(२८) ४३१३१ (०९-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर देवस्थान (ता.औसा, जि.लातूर) या ब वर्ग दर्जाच्या तीर्थक्षेत्र परिसरात भक्तांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक (औसा विधानसभा) लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दि.११/१२/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) श्री निळकंठेश्वर देवस्थानाच्या ठिकाणी स्त्री व पुरूष स्वच्छतागृह या २ कामांसाठी प्रत्येकी रु.३४.०० लक्ष प्रमाणे एकूण रु.६८.०० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. उर्वरित रक्कमेचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड ( जि. यवतमाळ) पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या हातला**
**येथील ग्रामपचांयतीत सचिव गैरहजर असल्याबाबत**

**(२९) ४३१३५ (११-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड ( जि. यवतमाळ) पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या हातला येथील ग्रामपचांयतीत सचिवांची गैरहजेरी असल्याने विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती उमरखेड यांनी चौकशी करुन संबंधित ग्राम सेवक यांना ग्राम पंचायतची मासिक सभा न घेतल्याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धोत्रा (ता.कळंब,जि.यवतमाळ) येथील लघु सिंचन प्रकल्पा करिता**
**संपादीत केलेल्या शेतजमिनींचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३०) ४३२६१ (११-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोत्रा (ता.कळंब,जि.यवतमाळ) येथील धोत्रा भुसंपादन क्रमांक २९/४७/०३-०४ नुसार लघु सिंचन प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या शेतजमिनीचा एल.ए.सी.प्रकरणात लागलेल्या निकालानुसार मोबदला देण्याकरिता प्रकल्पग्रस्त

शेतकरी यांनी जलसंपदा विभागाकडे मागणी केली असून आजपर्यंत मोबदला देण्यात आला नसल्याचे दिनांक १० फेब्रुवारी २०२२, रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२ )असल्यास, सदर शेतजमिनीचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकरी यांनी न्यायालयात अर्ज केला होता तसेच सदर प्रकरणाचा २०१७ मध्ये निर्णय झाल्यावर सात शेतकरी यांना मोबदला मिळाला आहे, तसेच उर्वरीत सहा शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू संबंधीत विभागाच्या अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे चार वर्षाचा कालावधी होऊनही प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर संबंधीत विभागाच्या अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) प्रस्तुत योजना मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत आहे. सदर प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या न्यायालयीन प्रकरणात वाढीव मोबदल्याकरिता एकुण १३१.९६ लक्ष इतक्या रक्कमेची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रस्तुत योजनेची प्रशासकीय मान्यता किंमत रु.२१०.८८ लक्ष असून, प्रकल्पाचे बांधकाम व भुसंपादन यावर एकुण रु.१७०.०३ लक्ष खर्च झालेला आहे. सबब मंजूर प्रशासकिय किंमतीच्या मर्यादेतील रु.४०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरचा निधी न्यायालयात जमा करण्यात आला आहे. उर्वरित मावेजासाठी सुधरित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्यानुसार सुधारीत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर उर्वरित वाढीव मोबदला शेतकऱ्यांना त्वरित अदा करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर (जि. सोलापूर) जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाने विकास कामांना समितीच्या सहमतीशिवाय प्रशासकीय मान्यता दिल्याबाबत**

**(३१) ४३३०१ (११-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर (जि. सोलापूर) जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने सुमारे १६ कोटी ५० लाख रुपयांच्या विकास कामांना समितीच्या सहमतीशिवाय अधिकाऱ्यांनी परस्पर प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त विकासकामांना परस्पर मान्यता का देण्यात आली याबाबतची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाकडून संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह यापुढे भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत वंचित लाभार्थ्यांचा समावेश करणेबाबत

**(३२) ४३३१२ (३१-०३-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रपत्र "ड" मध्ये ऑनलाइन समाविष्ट सादर असलेली नावे पात्र असतांनाही प्रपत्र "ड" च्या अंतिम यादीत समाविष्ट नसल्याने सदरील प्रकरणी चौकशी करून सदरील वगळलेली नावे व वंचित राहिलेले लाभार्थी पु:नश्च समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गटविकास अधिकारी पंचायत समीती औसा यांच्याकडे दिनांक ०३/१२/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदअनुषंगाने सदर प्रकरणी योजनेअंतर्गत वंचित लाभार्थ्यांचा समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) : (**१) होय.

(२) राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत "प्रपत्र ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यींपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.०९/०४/२०२१ व दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तांत्रिक कारणास्तव अपात्र ठरलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या नोंदी करण्यासाठी लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. या संदर्भात "प्रपत्र ड" मधील म्हणजेच आवास प्लसमधील लाभार्थ्यांना लाभ देण्याविषयी आतापर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून अद्याप प्राप्त नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा देलवाडी, जोलवाडी, अंबिकापुर, अंतोरा (ता. आष्टी, जि. वर्धा) येथील जमिन संपादित करण्याकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३३) ४३४९४ (३१-०३-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा देलवाडी, जोलवाडी, अंबिकापुर, अंतोरा (ता. आष्टी, जि. वर्धा) येथील रस्ता बांधकामा करिता भुसंपादनाचे प्रकरणे विशेष भुसंपादन अधिकारी सामान्य वर्धा यांना सादर करण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष भुसंपादन अधिकारी सामान्य वर्धा यांनी मौजा निहाय भुसंपादन जमिनीची राशी रू. २,६६,०००/- भरण्याचे कळविले होते त्यानुसार पत्र क्रं. जिपव/बांध/प्रआ ९५३/०६ दिनांक २८/०६/२००६ नुसार विशेष भुसंपादन अधिकारी, सामान्य वर्धा यांना पाठविली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हाधिकारी भुसंपादन वि.पा.वि.म.वर्धा कार्यालयाकडून प्रकरण क्र. ११७/२०१७ -१८, ११८/१७-१८, ११९/१७-१८, १२०/१७-१८ रस्त्याच्या जमिनीचा द्यावयाचा मोबदला सुधारित मुल्यांकनानुसार जमिन धारकांना द्यावयाची मोबदल्याची राशी १,०६,२९,५०२ /- एवढी देणे असून यावर आजपर्यत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भुसंपादन कामा करीता निधी ३०५४-२४१९ ग्रामिण मार्ग व पुल रस्ते या कार्यक्रमातंर्गत उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-११-२०२२) :**(१) , (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) लेखाशिर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम या योजनेमध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांची केवळ देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. सदर योजनेमधून ग्रामीण रस्त्याच्या भूसंपादनाकरिता मोबदला देण्याबाबतची कोणतीही तरतूद नाही.
त्यामुळे सदर रस्त्यांसाठी भूसंपादनाची आवश्यकता भासल्यास जिल्हा परिषदेने स्वनिधीतून अथवा जिल्हा वार्षिक योजनेतून त्याकरिता त्यांचे स्तरावर तरतूद करावी, अशा सूचना जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत.

---

## जळगांव जिल्हा परिषद मालकीच्या पाझर तलावांतून अवैधरित्या गौणखनिज वाहतुक प्रकरणी चुकीचे आदेश पारित केलेबाबत.

**(३४) ४३५४८ (२९-०३-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा परिषद मालकीच्या पाझर तलावांतून अवैधरित्या गौणखनिज वाहतुक केल्याप्रकरणी अभियंत्यासह १४ कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्याचे चुकीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांनी पारित केल्याचे माहे २५ नोंव्हेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सुमारे ६३ लाखांचे वर रक्कम व्याजासह वसूल करण्याचे चुकीचे आदेश देखील पारित केले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सीईओ, जिल्हा परिषद जळगाव यांनी चुकीचे आदेश पारित केल्या प्रकरणी संबंधीत दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय अ ाहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
गुन्हा दाखल करण्याचे आदेश चुकीचे नाहीत.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
सर्व संबंधित कंत्राटदारांकडून स्वामित्व धनाची वसुलपात्र रक्कम रु. ३३,९८,८८७.०० व्याजासह वसुल करण्यात आलेली आहे.
(३) सदर प्रकरणी जिल्हा परिषद जळगाव स्तरावरील चौकशी समितीने चौकशी केली आहे. तसेच जिल्हाधिकारी यांचे प्राप्त निर्देशान्वये वाळू वाहतुक परवाने अवैध असल्याचे दिसुन आले आहे. त्यानुसार अवैध परवाने व बनावट पावत्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांनी संबंधित कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन स्वामित्व धनाची रक्कम व्याजासह वसुल करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यवाही शासनाच्या प्रचलीत नियमांनुसार व महसुल वाढीच्या अनुषंगाने केलेली असून शासन हिताची आहे.
सदर प्रकरणाशी संबंधित तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांना ज्ञापन दोषारोप बजावण्यात आले असुन त्यावरील कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय व निम शासकीय कर्मचारी यांना ( NPS/ DCPS) मृतू पावल्यास सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत**

**(३५) ४३६८७ (०१-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नोव्हेबर २००५ नंतर रुजू झालेले शासकीय व निम शासकीय कर्मचारी ( NPS/ DCPS) मृत पावल्यास १०.०० लक्ष सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०९ जुलै २०२० नुसार शासनाकडून सर्व जिल्ह्यातून प्रस्ताव मागितले होते परंतु अद्याप यावर कोणत्याच प्रकारची कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदृअनुषंगाने सदर प्रकरणी शासनातर्फे १०.०० लक्ष सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-११-२०२२) :** (१) हे खरे नाही

(२) प्रश्न उभ्दवत नाही.

(३) वित्त विभागाकडून उपलब्ध होणा-या निधीच्या प्रमाणात कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत

---

**गोंदिया येथील वैद्यकिय महाविद्यालय व गंगाबाई स्त्री रुग्णालय येथे औषध मिळत नसल्याबाबत**

**(३६) ४३६९१ (१२-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्यितील वैद्यकीय महाविद्यालय व गंगाबाई स्त्री रुग्णालय येथे बाह्यरुग्णांना तेथील डॉक्टरानीच लिहून दिलेली औषध मिळत नसल्याने त्यांना औषधे बाहेरून खरेदी करावी लागत आहे,हे खरे आहे काय ,

(२) असल्यास , याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयात औषधांचा साठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३०-०९-२०२२) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरेड विधानसभा क्षेत्रातील, भिवापूर तालुक्यातील गोसखुर्द प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या प्रलंबीत समस्यांचे निवारण करण्याबाबत**

**(३७) ४३७०९ (०१-०४-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड विधानसभा क्षेत्रातील, भिवापूर तालुक्यातील गोसेखुर्द प्रकल्पातील थुटानबोरी या गावात ४ वर्षापासून लाईट (इलेक्ट्रिसिटी) नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरेड विधानसभा क्षेत्रातील, भिवापूर तालुक्यातील गोसेखुर्द प्रकल्पातील शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलाशया सोबतच येथील स्थानिक शेतकऱ्यांचा विकास होत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची व बेरोजगारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदृअनुषंगाने सदर प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या प्रलंबीत समस्यांचे निवारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही,
गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांना रु.१५२ कोटी व रु.१२०० कोटी विशेष पॅकेज मंजुर केलेले असुन, मा. मुख्य मंत्री विशेष पॅकेज अंतर्गत नोकरीऐवजी एकमुस्त अनुदान रु. २.९० लक्षाचा लाभ देय असुन, आतापर्यंत मंजुर ५३४.८७ कोटीपैकी ४२९.६७ कोटीचा निधी उपजिल्हाधिकारी भुसंपादन नागपुर/भंडारा मार्फत वाटप करण्यात आला असुन उर्वरीत मोबदला वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा विधानसभा मतदारसंघातील साठवण तलावांच्या सर्वेक्षणासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(३८) ४३७८९ (१२-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा विधानसभा मतदारसंघातील औसा व निलंगा तालुक्यात साठवण तलावांच्या साईट उपलब्ध असून सदर साठवण तलावांचे सर्वेक्षण करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद मंजूर करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आणि साठवण तलावाचे सर्वेक्षण करण्याबाबत सन २०२० सन २०२१ व सन २०२२ मध्ये वेळोवेळी झालेल्या तहसील कार्यालयातील व जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा स्तरीय आढावा बैठकीत मा. कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग लातूर तसेच कार्यकारी अभियंता लातूर पाटबंधारे विभाग क्र.१ लातूर यांच्याकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) औसा मतदारसंघातील औसा व निलंगा तालुके मांजरा नदी उपखो-यात येतात. एकात्मिक जल आराखड्यानुसार मांजरा उपखो-यात नवीन राज्य योजनांसाठी पाणी उपलब्धतता नसल्यामुळे विभागाकडून साठवण तलावांच्या सर्वेक्षणाची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आनंदवाडी (ता.औसा, जि.लातूर) येथील विधानसभा मतदारसंघातील अतिवृष्टीत वाहून गेलेल्या पुलांचे बांधकाम करण्याबाबत**

**(३९) ४३७९३ (०१-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आनंदवाडी (ता.औसा) विधानसभा मतदारसंघाच्या गावातील रस्त्यावरील पूल सन २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत वाहून गेलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील वाहून गेलेल्या पुलाची दुरूस्ती करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर व उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग औसा यांच्याकडे दिनांक २४/०९/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरील पूलांची दुरूस्ती करण्यासाठी किती निधीची आवशकता असून सदरील पूलांची दुरूस्ती करण्याबाबत आवशक निधीची तरतूद करून दुरुस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-११-२०२२) :** (१) सदर पुलाचा वेअरिंग कोट क्षतीग्रस्त झालेला आहे, हे खरे आहे.
(१) हे खरे आहे.
(३) सदर पुलाची जिल्हा परिषदेने पाहणी केली असून मौ.आनंदवाडी येथील पुलाचा वेअरींग कोट वाहून गेलेला आहे. सदर पुलाच्या दुरुस्तीसाठी रु.१०.०० लक्ष निधी आवश्यक असून निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्ती करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खैरी पुनर्वसन (ता. कारंजा,जि. वर्धा) या पुनर्वसीत गावाला ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत.**

**(४०) ४३८३७ (०१-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खैरी पुनर्वसन (ता. कारंजा,जि. वर्धा) या गावाचे.सन २००० मध्ये कारंजा गावाजवळ पुनर्वसन करण्यात आले असून या गावाची लोकसंख्या ७०० ते ८०० असून देखील या गावाला अजून पर्यत स्वतंत्र ग्रामपंचायत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खैरी पुनर्वसन येथे स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्यामुळे तेथील नागरीकांना पंचायत समिती व जिल्हापरिषद अंतर्गत येणाऱ्या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या पत्रानुसार अजून पर्यत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने खैरी पुनर्वसन गावाला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे, खरे नाही.
(३) व (४) ता. कारंजा (घा) येथील ग्रामपंचायत जऊरवाडा अंतर्गत मौजा खैरी (पुनर्वसन) या नावाने नविन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा. मंत्री (ग्राम विकास) यांना सादर करण्यात आला. तथापि दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ रोजी निवडणूक आयोगाने जाहिर केलेली महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ व त्यानंतर जाहिर झालेल्या ग्रामपंचायत निवडणूका यामुळे प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायत स्थापनेबाबत अधिसूचना निर्गमित करण्यात आली नाही.
प्रस्तुत प्रस्तावामध्ये विद्यमान ग्रामपंचायत जऊरवाडाची मुदत दिनांक १६.०८.२०२० रोजी संपलेली असल्याने शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४, शासन परिपत्रक दिनांक ०२ सप्टेंबर, २००६ व राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक २७ जानेवारी, २००५ मधील तरतुदीनुसार सदरचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांना दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये परत पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नायगाव (जि.नांदेड) मतदारसंघात ९०% इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्ते नादुरुस्त असल्याबाबत

**(४१) ४३९४६ (११-०४-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) मतदारसंघात ९०% इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्ते नादुरुस्त अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यामुळे शाळेतील विद्यार्थांना वेळेत पोहचता येत नाही तसेच शेतकऱ्यांना शेतमालाची बाजार पेठेत ये-जा करणासाठी अनेक समस्या निर्माण होत असल्याने सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ते दुरुस्त करण्यासाठीही जिल्हा परिषदेचा निधी कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) नांदेड जिल्ह्यातील नायगांव विधानसभा मतदार संघात नायगाव, धर्माबाद, उमरी या तीन तालुक्यांचा समावेश आहे. सदर तालुक्यातील इजिमा व ग्रामा दर्जाच्या रस्त्यांची लांबी अनुक्रमे २५८ किमी व ३४६ किमी एवढी आहे.

नांदेड जिल्ह्यातील नायगांव मतदार संघातील इजिमा व ग्रामा साठी सन २०१८-१९ ते २०२०-२१ पर्यंत खालील प्रमाणे निधीउपलब्ध करुन देण्यांत आला आहे.

(रु.लक्ष)

| वर्ष | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|
| निधी | ३०९.५० | २१५.०० | २९६.०० |

तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ते दुरुस्त करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील असंघटीत सफाई कामगारांना कायदेशीर संरक्षण मिळण्याबाबत

**(४२) ४४८४३ (०७-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील असंघटीत सफाई कामगारांना कायदेशीर संरक्षण मिळावे याकरीता माथाडी कामगार बोर्डाच्या धरतीवर ''असंघटीत सफाई कामगार कल्याण मंडळाची'' स्थापना करावी अशी मागणी मा.कामगार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे अखिल भारतीय बांधकाम जनरल कामगार युनियन, सफाई कामगार सेल यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०९-१२-२०२२) :** (१)होय,हे खरे आहे.

(२) असंघटित सफाई कामगारांसह असंघटीत क्षेत्रातील सर्व व्यवसाय धारकांचा समावेश असलेले महाराष्ट्र राज्य असंघटीत कामगार कल्याण आभासी महामंडळ स्थापना करण्याबाबतच्या मंत्रिमंडळ प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील घरेलू कामगारांना किमान वेतन लागू करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(४३) ४४९३६ (०७-१०-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घरेलू कामगारांना किमान वेतन लागू करण्यासाठी त्यांच्या वेतनाचा समावेश किमान वेतन अधिनियमातील शेड्यूल मध्ये असणे आवश्यक असल्याने वेतन संहिता, २०२० लागू करण्यास विलंब होत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वेतन संहिता, २०२० लागू झाल्यास घरेलू कामगारांचा व्यवसाय ज्या श्रेणीत येईल त्या श्रेणीतील वेतन त्यांना लागू होणार, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२०-१२-२०२२) :** (१) वेतन संहिता, २०२० लागू करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.
(२) प्रश्न उद्भत नाही.
(३) प्रश्न उद्भत नाही.
(४) प्रश्न उद्भत नाही.

---

### परभणी जिल्ह्यात खेळांडूसाठी क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(४४) ४५५६५ (२५-१०-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात खेळांडूसाठी अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्यासाठी शहरातील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील जागा देण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलासाठी १० हेक्टर जागा हवी असताना १० एकर जागेचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याने सदर प्रस्ताव रद्द करुन दुरुस्तीसह नवीन प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना तत्कालीन कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हा प्रशासनास केल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार उक्त नवीन प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-१२-२०२२) :** (१), २) व ३)

तत्कालिन मा. मंत्री (कृषी) महोदयांच्या आदेशानुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या ठराव क्र. १०/१०७/२०२२ दि. १६.०६.२०२२ अन्वये क्रीडा संकुलासाठी १० एकर जागे ऐवजी २५ एकर जागा उपलब्ध करून देण्याबाबतच्या प्रस्तावाला कृषी परिषदेने मान्यता देऊन कृषी विद्यापीठामार्फत प्रस्ताव कृषी विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर जागा क्रीडा विभागाच्या नावे झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी ) ग्रामस्थांकडून नदीवर पुल बांधण्याची होत असलेली मागणी

**(४५) ४५८३३ (०९-१०-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी ) कळबर्णा बु. उपजिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी हंबीरवाडी, सुतारवाडी, जोशीवाडी, तांबडवाडी ग्रामस्थांकडून पुलाची वांरवार मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीवर पुल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे एप्रिल, मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोणता निर्णय घेण्यात आला आहे, तसेच त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२ ) सदर पूल बांधण्याची ग्रामस्थांची मागणी आहे, हे खरे आहे. तथापि यासंदर्भात निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्नांकित पूल बांधण्याची मागणी ही कळंबणी बु. उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या योजनाबाह्य रस्त्यावर करण्यात आली असून सदर रस्त्याने रुग्णालयाचे अंतर अंदाजे ०.५०० कि.मी. एवढे आहे.

सद्यस्थितीत सदर ग्रामस्थांना ग्रामीण मार्ग ११ व ग्रामीण मार्ग १९८ मार्गे उपजिल्हा रुग्णालयाकडे जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध असून सदर रस्त्याने रुग्णालयाची लांबी १.५०० कि.मी. एवढी आहे.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार योजनाबाह्य रस्त्यावर चोरद नदीवर मोठा पूल बांधावा लागणार असून योजनाबाह्य रस्त्यावर पूल बांधणे शक्य नाही. तसेच ग्रामस्थांना जवळचा पर्यायी रस्ता उपलब्ध असल्यामुळे सदर ठिकाणी नवीन पूल बांधून नवीन रस्ता करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यातील ( जि.रत्नागिरी)' देवाचा डोंगर रस्ता अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) ४५८४४ (२५-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तुळशी ब्रुद्रक देवाचा डोंगर रस्त्याचे काम अपुर्णावस्थेत असल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे तेथील आबाल वृध्दांना तसेच रुग्णांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रस्ता दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या एकूण ५.३०० कि.मी. लांबीपैकी २.०० कि.मी. लांबी सुस्थितीत असून ३.३०० कि.मी. लांबी दुरुस्त करणे आवश्यक आहे.

(३) खेड तालूक्यातील डोंगर रस्त्याचे रस्ते विकास योजना सन २०२१ नुसार तूळशी बु. जामगे रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२२ असे नाव असून सदर रस्त्याची अस्तित्वातील एकूण लांबी ५.३०० कि.मी. आहे.

सदर रस्त्याची नादुरुस्त असलेली लांबी दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने विविध योजनांमध्ये सादर केला असून निधीच्या उलब्धतेनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा येथे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरचा पृथ्वीराज पाटील यांनी महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकविल्याबाबत

**(४७) ४६०११ (२७-१०-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रात मानाचे स्थान असलेली ६४ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सातारा येथे कोल्हापूरच्या पृथ्वीराज पाटील यांनी महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकाविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विजेत्या पैलवानाला केवळ गदाच आल्यामुळे पैलवानाला बक्षीस कोण देणार असा प्रश्न उपस्थित झाला असून कुस्ती आयोजक यांनी कुस्ती परिषदेकडे पैसे भरत असल्यास पैलवानाला रोख बक्षीस देण्याची मागणी कुस्ती गिराकडून होत असतानाही कुस्तीगीर परिषद केवळ पैलवानाला वार्षिक मानधन आणि गदा देत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पैलवानाच्या खुराकासाठी महिन्याला ४० ते ५० हजार रुपये खर्च अपेक्षित असून गरीब कुटुंबातील पैलवानाला हा खर्च शक्य नसल्याने महाराष्ट्र केसरी विजेत्यास रोख रक्कमेचे बक्षिस मिळावे अशी मागणी पैलवानांकडून राज्यात चांगले घडविण्यासाठी करण्यात येणाऱ्या योजना अपुऱ्या असल्याने या योजनांमध्ये वाढ करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-१२-२०२२) :** (१) होय

(२), (३) व (४) शासनाच्या दि.०७ मे, २०२१ च्या शासन निर्णयानुसार फ्री स्टाईल गादी व माती विभाग, उदयोन्मुख (कुमार गट), ग्रीक रोमन वरिष्ठ गट, महिला गट या प्रकारातील प्रत्येकी १० वजनी गटातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना सुधारीत दराने मानधन देण्यात येते.

महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त मल्लास शासनामार्फत रोख पारितोषिक देण्याची बाब तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील घरेलू कामगार महिलांसाठी शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा व सेवा सुरक्षा कायदा तयार करण्याबाबत

**(४८) ४६०८६ (०९-११-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घरेलू कामगार महिला वर्गाची संख्या मोठ्या प्रमाणात असून शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळावा व सेवा सुरक्षा कायदा करण्यात यावा, अशी मागणी घरेलू कामगारासाठी काम करणारी नॅशनल डोमेस्टिक वर्कस वेल्फेअर ट्रस्ट या संस्थेने नुकतीच शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेने वेळोवेळी आंदोलने, मेळावे, उपोषणे याद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत निर्णय घेऊन राज्यातील घरेलू कामगार महिलांसाठी शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा व सेवा सुरक्षा कायदा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१३-१२-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित घरेलू कामगारांना अंत्यविधी अर्थसहाय्य योजना व प्रसुती लाभ योजना या योजनांचे लाभ देण्यात येतात. तसेच, केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेमध्ये घरेलू कामगार सहभागी होऊ शकतात.

सध्यस्थितीत महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम, २००८ अस्तित्वात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामणगाव रेल्वे मतदार संघातील (जि.अमरावती) प्रस्तावित तिर्थक्षेत्र विकास ‘‘ब’’ वर्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४९) ४६५५२ (०९-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे मतदार संघातील (जि.अमरावती) प्रस्तावित तिर्थक्षेत्र विकास ‘‘ब’’ वर्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगाव रेल्वे) यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर मागणीनुसार तिर्थक्षेत्र विकास ‘‘ब’’ वर्ग दर्जा देण्याबाबत व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०१-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनातील नमूद तीर्थस्थळास ब-वर्ग दर्जा देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचे त्रुटीची पूर्तता करण्यासाठी दि.२९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मु.का.अ. जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघातील (जि.अमरावती) येथील ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी २५१५ योजने अंतर्गत कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(५०) ४६५५३ (०७-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघातील (जि.अमरावती) येथील ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी २५१५ योजनेअंतर्गत कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगाव रेल्वे) यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १६.०२.२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त मागणीनुसार सदरहू भागातील रस्त्यांकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-१२-२०२२) :** (१) , (२) व (३) याबाबतचे निवेदन आढळून आले नाही. मात्र, धामणगांव रेल्वे मतदारसंघ, जि. अमरावती येथील मा. लोकप्रतिनिधींची दिनांक २१.३.२०२२ आणि १४.९.२०२२ रोजीची मागणी विचारात घेऊन लेखाशीर्ष २५१५ १२३८ योजनेंतर्गत सन २०२१-२२ आणि २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये अनुक्रमे रु. १००.०० लक्ष आणि रु. ५००.०० लक्ष इतका निधी मंजूर केला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.